FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED

(A Government of Maharashtra Enterprise)

OFFICE OF THE DIVISIONAL MANAGER FOREST PROJECT DIVISION YAVATMAL

"Vanbhavan" Administrative Building, Ground Floor, Church Road, Civil Line, Yavatmal 445 001

ई-निविदा सुचना क्रमांक - ०४ / २०२६-२०२७

महाराष्ट्र शासनाचे सक्षम प्राधिकरणाकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द असलेल्या **यवतमाळ जिल्हयातील मजुर कामगार सहकारी संस्था** कडुन ब-१ विवरण पत्रा प्रमाणे ई-निविदा प्रपत्रात विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ हे खालील निर्देशीत कामाकरीता प्रतिशत टक्केवारी दराने ई-निवीदा पध्दतीच्या माध्यमातुन ई-निविदा आमंत्रीत करीत आहेत. निवीदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा दिनांक २०/११/२०२६ पासुन पाहण्यास उपलब्ध

काम कं.	कामाचे नाव	वनपरिक्षेत्र	निविदा ब प्रमाणे कामाची किंमत	निविदा स्वीकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम २%	ई-निविदा नमुन्याची किंमत रुपये	कामपुर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदारा चा वर्ग	शेरा
१	Providing and Erecting 1.80 Mt Height Fixed Knot Fencing with Mainand Wicket Gate to Bamboo Plantation of 53.60 Ha in Comp. No. 511 In Savargad Beat, Mhasola Round Ladkhed (FDCM) Range Forest Project Division Yavatmal L 4854 Mt	Ladkhed Range	4582682	91654	1180	४५ दिवस	वर्ग-अ मजुर सहकारी संस्था	-

ई - निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा भरणेची दिनांक, निविदेचा नमुना, निविदेसंबंधी ईतर तपशील खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.

१) कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/११/२०२६ ते ०५/१२/२०२६ ला ५.०० वाजेपर्यंत भरता येतील.

२) निविदा दि. ०७/१२/२०२६ रोजी ११.०० वाजता विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचे कार्यालय येथे उघडण्यात येतील. निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांनी राखुन ठेवला आहे.

३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

४) निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/११/२०२६ ते ०५/१२/२०२६ ला ५.०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल.

स्वा /-
विभागीय व्यवस्थापक
वन प्रकल्प विभाग, यवतमाळ

ई-निविदा संबंधी अटी व शर्ती

१) निविदा फॉर्म फी व अनामत रक्कमेचा भरणा Online Banking प्रणाली द्वारे करावा. प्रत्येक कामासाठी वेगळा निविदा फार्म व अनामत रक्कम भरणे गरजेचे राहील. ऑनलाईन भरलेल्या अनामत रक्कम (EMD) ची प्रत स्कॅन करुन सादर करावी.

२) मजुर सहकारी संस्था ही महाराष्ट्र शासनाचे सहकारी विभागाकडे / जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे "अ" वर्ग नोंदणीकृत असावी. मजूर सहकारी संस्था यांची कामाची मर्यादा ५० लाखापर्यंत असल्याची सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ठरविलेली आहे. प्रत्येक काम हे ५० लाखाच्या वर नसल्याने या कामास सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पंजीकरण प्रमाणपत्र असणे आवश्यक नाही. सहकारी संस्थांनी ई निविदा प्रणालीद्वारे निविदा भरतांना सहकारी विभागाकडील पंजीकरण प्रमाणपत्र, विक्रीकर / वॅट नोंदणी प्रमाणपत्र, GST नोंदणी, ना देय (clearance) प्रमाणपत्र, मागील 3 वर्षाचा आयकर भरल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास) जोडणे बंधनकारक राहिल. तसेच ३० लक्ष पर्यंतचे काम पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्क.

३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रं.ग्रासयो-२०१९/प्र.क्र.११२/बांधकाम-२ बांधकाम भवन, सातवा मजला, २५, मर्झबान पथ, फोर्ट मुंबई दिनांक ३० जुन २०२० व ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : ग्रासयो-२०१९/प्र.क्र.११२/बांधकाम-२ दिनांक २१ सप्टेंबर २०२० अन्वये मान्यताप्राप्त नोंदणीकृत मजुर सहकारी संस्थांना पतदारी प्रमाणपत्र देण्याच्या अटीतून सुट देण्यात यावी. **मात्र संबंधीत जिल्हा उप निबंधक (सहकार) किंवा जिल्हा सहकारी संघाकडून त्यांना देण्यात आलेले काम करण्याची आर्थिक पात्रता असल्याचा दाखला मजूर सहकारी संस्थांनी सादर करणे आवश्यक आहे.**

४) **मजुर कामगार सहकारी संस्था** चा कायमचा पत्ता, पॅन कार्डची प्रत जोडण्यात यावी.

५) संस्थेकडून निविदेमध्ये सादर करण्यात येणारे दर सर्व करासह अंतीम स्वरुपाचे असावे.

६) अटीयुक्त निवीदा स्विकृत करता येणार नाही.

७) महाराष्ट्र शासनाचे कामगार विषयक कायद्याच्या व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत **मजुर कामगार सहकारी संस्थाची** राहील.

८) कामादरम्यान कोणतीही जिवित/वित्त हानी झाल्यास त्यास वन प्रकल्प विभाग जबाबदार राहणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत **मजुर कामगार सहकारी संस्थाची** राहील. तसेच कामा दरम्यान कोणतेही शासकिय मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी. तसे झाल्यास शासकीय नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

९) वाटप झालेली कामे अर्धवट स्वरुपात टाकुन दिल्यास केलेल्या कामाची कोणतीही रक्कम दिली जाणार नाही. अथवा परस्पर दुस-या कंत्राटदारास कामे हस्तांतरीत करता येणार नाही.

१०) कामाची सविस्तर माहिती, अटी व शर्ती करिता तसेच अंदाजपत्रकीय व इतर माहिती करिता विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडुन) उपलब्ध होवू शकेल.

११) निविदा सादर करण्यापुर्वी **मजुर कामगार सहकारी संस्थाने / प्रतिनिधीने** स्थळाला भेट देऊन वास्तविक स्थितीची पाहणी करुनच सादर केलेली आहेत, असे गृहीत धरण्यात येत असुन अंदाजपत्रकात कार्यारंभ आदेशा नंतर किंवा काम सुरु असतांना चे दरम्यान कोणतीही वाढ अथवा बदल करता येणार नाही.

१२) निविदा स्विकृत झाल्याबाबत लेखी कळवताच पाच दिवसांचे आंत कंत्राटदारास त्यांचे मंजुर निविदा रक्कमेच्या आधारे योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. स्टॅम्प पेपरचा खर्च संबंधित **मजुर कामगार सहकारी संस्थाचा** असेल.

१३) कामे सुरु असतांना कामाच्या नोंदी प्रमाणित केलेल्या मापनपुस्तिकेत (M.B.Register) दर्शवुन त्याचे परिमाण व तांत्रिक गुणवत्ते बाबत वेळोवेळी तपासणी सक्षम प्राधिकरणा मार्फत केल्या जाईल व त्यांचे योग्यते बाबतचे निरीक्षण अहवाला नुसारच कामाच्या रक्कमेचे सवितरण करण्यात येईल.

१४) कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे किंवा स्विकारण्याचे व अटी व शर्तीमध्ये बदल करण्यांचे अधिकार विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांनी राखुन ठेवले आहेत.

१५) बयाणा अग्रिम देण्यांची तरतुद नाही.

१६) कामाचे देयकामधुन शासनाचे नियमानुसार कपाती (इन्कमटॅक्स, रॉयल्टी, इंन्सुरन्स, सुरक्षा राशी) इत्यादी कपात करण्यात येईल. काम पुर्ण झाल्यावर काम तसेच कामगिरी (performance) समाधानकारक असल्यास कपात केलेली सुरक्षा राशी 1 **वर्ष (१२ months)** (Defect Liability period) संपल्यानंतर परत करण्यात येईल.

१७) **कंत्राटी कामासाठी आयकर विभागाचे निर्देशानुसार जी.एस.टी. ची कपात अनुज्ञेय राहील. कंत्राटदारने अतिरीक्त जी.एस.टी. कराचा बोझा विचारात घेऊनच दर नमुद करावेत.**

१८) **निविदा सादर करतांना नियमानुसार GST नोंदणी क्रमांक सादर करणे आवश्यक आहे.**

१९) कामाचे परिमाण व तांत्रिक गुणवत्तेबाबत टप्पानिहाय समांतर मूल्यमापन व अंतिम मुल्यमापन वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच इतर तांत्रिक अधिकारी किंवा संस्थे मार्फत करण्यात येईल आणि त्या यंत्रणेच्या प्रमाणपत्रानुसार झालेल्या तसेच क्षेत्रीय स्तरावरुन कामाच्या पुर्णत्वाचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयके अदा करण्यात येतील.

२०) मजुर सहकारी संस्थेकडे निविदेतील कामासाठी आवश्यक तांत्रीक मनुष्यबळ असणे गरजेचे आहे.

२१) कार्यारंभ आदेशापासुन ठरलेल्या मुदतीत काम पुर्ण न झाल्यास प्रतिदिवस प्रमाणे दंड आकारण्यात येईल. दंड आकारणी ठरविण्याचे अधिकार विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचेकडे राखीव असतील.

२२) कामाचा कार्यरंभ आदेश हा निधी उपलब्धतेवर अवलंबुन राहील.

२३) निवीदा दरात समान दर आल्यास त्याबाबतचे अंतीम निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांच्याकडे राखीव ठेवण्यात आलेले आहे. तसेच इतर तांत्रीक व प्रशासकीय अडचणीत वादविवाद आल्यास त्याबाबतचे अंतीम निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचेकडे राखीव ठेवण्यात आलेले आहे.

२४) सदर कामे राखीव वनातील असल्यामुळे **मजुर कामगार सहकारी संस्थेने** वन कायद्याचे (IFA-१९२७,WLPA १९७२, FCA १९८०) उल्लंघन केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२५) निविदा भरणेपुर्वी महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन परिपत्रक क्रं.सी.ए.टी. २०१७/प्र.क्रं.०८/इ.मा.-२/ मंत्रालय मुंबई दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ चे शासन निर्णयाचे अवलोकन करावे. सदर शासन निर्णयात नमूद अटी **मजुर कामगार सहकारी संस्थेला** लागु राहतील.

दिनांक २७.०९.२०१८ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रं. ४.६ व मुद्दा क्र. ५.१.१ नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit), निविदेचा लिफाफा क्रं.२ मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना दि.२६ नोव्हेंबर २०१८ चे परिपत्रकानुसार रद्द करण्यात आल्या असुन लिफाफा क्रं.१ व लिफाफा क्रं.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या **L-१ निविदाकाराने "Additional Performance Security Deposit" (within ८ days) आठ दिवसांचे आंत कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील. लिफाफ्यावर कामाचे नांव व निविदा सुचना क्रमांक लिहिण्यात यावा. ही आठ दिवसाची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.**

देकार १५ % पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रकमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. 19 % कमी दरासाठी खालील प्रमाणे दर पृथःकरण :-

10 % कमी दरापर्यंत 1%

15 % पर्यंत कमी दरापर्यंत - (१५% - १० % = ५%)

तसेच (19-15) = ४ % करीता (४ x २ =) 8 % असे एकुण (१+५+८) = १४ %)

२६) कामाच्या अनुषंगाने तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री असणे आवश्यक आहे.

२७) सदर कामाचे वेळी वनाधिका-यांच्या सुचनेचे / निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

२८) ई-निविदेसोबत जोडावयाचे आवश्यक दस्तऐवज सोबतच्या तपासणी सूचीत दर्शविलेल्या क्रमानेच जोडावे. **अनावश्यक कागदपत्र जोडू नयेत.**

२९) आपण सादर केलेली सर्व कागदपत्रे विश्वासार्ह / सत्य आहे या आधारावर निविदा प्रक्रीयेची कार्यवाही करण्यात येईल. कागदपत्रे खोटी आढळून आल्यास त्याकरीता आपण सर्वस्वी जबाबदार राहाल.

३०) **अनुदान उपलब्धतेनुसार देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.**

३१) **विहीत केलेल्या मुदतीत काम पुर्ण न झाल्यास विलंबासाठी भरपाई प्रस्ताव चे अनुषंगाने Tender Document मधील Clause-2 Page No.33 नुसार कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल याची कंत्राटदाराने नोंद घ्यावी.**

३२) "कार्यारंभ आदेश" दिल्यानंतर पाच दिवसांच्या आंत मध्ये प्रत्यक्ष काम सुरु न केल्यास, कोणताही पत्रव्यवहार न करता, संबंधित कंत्राटदाराकडून काम काढून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३३) वनप्रकल्प विभाग, यवतमाळ मध्ये काम अपुर्ण नसल्या बाबत Tender Document मध्ये जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र स्वहस्ताक्षरात सादर करावे. सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील माहिती / मजकुर खोटा आढळून आल्यास किंवा वन प्रकल्प विभागा यवतमाळ मध्ये कामे अपुर्ण असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतास तांत्रिक पडताळणीमध्ये अपात्र करण्यात येईल.

३४) कोणत्याही विभागातील ब्लॅक लिस्ट मध्ये नांव नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (१००/- रु.स्टॅम्प पेपरवर)

स्वा /-
विभागीय व्यवस्थापक,
वन प्रकल्प विभाग, यवतमाळ

Check List of document to be Uploded along with e-tender

Scanned copy of following documents should be uploaded by the bidders in the form of PDF format in the same order as mentioned below, on the e-tendering website during Online Bid preparation stage.

Sr.No.	Item
1	EMD by online paid Scanned Copy of EMD online payment
2	Scanned copy of original valid certificate of a Registered Labour Co-Operative Society with the Government of Maharashtra
3	Scanned copy of GST Registration No.
4	Scanned Copy of Original Certificate from District Deputy Registrar / District Labour Co-Operative Federation regarding financial capacity of Labour Co-Operative Society to execute the works quoted in the tender.
5	Covering letter on Bidders Letter Head mentioning official address, Contact No. & Bio Data
6	Scan Copy of Pan Card
7	Income Tax Returns Certificate of last three financial years.
8	महाराष्ट्र शासनाचे सक्षम प्राधिकरणाकडे ३० लक्ष पर्यंतचे काम पूर्ण केल्याचा अनुभव प्रमाणपत्र.
9	काम अपुर्ण नसल्या बाबतचे प्रतीज्ञापत्र (सदर प्रतिज्ञापत्र स्वहस्ताक्षरात असावे.)
10	काम विहीत मुदतीत पुर्ण करुन देण्या बाबतचे हमीपत्र.
11	Not Blacklisted Certificate